## जनसंपर्क विभाग

**बातमी - १**

जळगाव दि. २० (       ) पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (महिला) स्पर्धेच्या दुसऱ्या दिवसीच्या पहिल्या सत्रात महाराष्ट्रातील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि सोलापूर विद्यापीठ  या चार विद्यापीठांनी बाद फेरीत विजय प्राप्त केले.

मंगळवारी सकाळच्या सत्रात अ गटामध्ये तीन सामने झाले. यामध्ये सौराष्ट्र विद्यापीठ राजकोटने देवी अहिल्याबाई विद्यापीठ इंदौरचा १ डाव ८ गुणांनी (१२-४) पराभव केला. सौराष्ट्रच्या अमृताबेन गोहिल हिने पाच गडी बाद करताना ५.२० मिनीटे संरक्षणात्मक खेळ केला तर निधी बोरसेने पहिल्या डावात १.४० व दुसऱ्या डावात ३३० मिनीटे खेळ केला. देवी अहिल्याबाई विद्यापीठाच्या रितीका दुबेने ४ मिनीटे खेळ करत एक गडी बाद केला. याच गटात दुसऱ्या झालेल्या सामन्यात महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेरने ज्योती महिला विद्यापीठ, जयपूरवर १ डाव १४ गुणांनी (१७-९) असा एकतर्फी विजय मिळवला. महर्षी दयानंदच्या शिल्पा बस्तीने ७.३० मिनीटांचा उत्तम खेळ केला तर बबीता पांडेने ५.४० मिनीटे खेळ केला. पुजा रायरे ही दोन मिनीटे खेळली आणि पाच गडी बाद केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने विक्रम विद्यापीठ, उज्जैनचा पूर्वा पावडे, श्रध्दा बोडीले आणि पायल जाधव या खेळाडूंच्या उत्तम खेळीने १ डाव ९ गुणांनी (१५-६) पराभव केला.  पूर्वा पावडे ही २.३० मिनीटे खेळली व पाच गडी बाद केले.

ब गटात बरकतुल्लाह विद्यापीठ भोपाळने सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभनगर, गुजराथचा १ डाव १ गुणाने (११-१०) पराभव केला. नैना जैन हिने पहिल्या डावात २.३० मिनीटे खेळ केला व पाच गडी बाद केले. रितीका सलोरीया व अंकिता विश्वकर्मा यांनी देखील उत्तम खेळ केला. दुसऱ्या सामन्यात गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या संघाला वीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठ, सुरत यांच्याकडून १ डाव १० गुणांनी (३-१३) पराभूत व्हावे लागले. वीर नर्मदच्या ओपिना भिलार व प्रियंका पटेल यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. या गटातील अन्य सामन्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने महाराजा कृणककुमारसिंहजी भावनगर विद्यापीठावर १ डाव १३ गुणांनी (१९-६)मात केली. नागपूरच्या दिशा शिंदे व मृणाली कृणाल यांनी प्रत्येकी २.४० मिनीटे खेळ करून २ गडी बाद केले.

क गटात जय नारायण व्यास विद्यापीठ जोधपूर या संघाला पंडीत दीनदयाल उपाध्याय शेखावती विद्यापीठ, सिकर यांच्याकडून १ डाव ४ गुणांनी (१-५) पराभूत व्हावे लागले. पंडीत दीनदयाल संघातील संतोषकुमारी ही ७.२० मिनीटे खेळली व एक गडी बाद केला. महाराजा सुरजमल ब्रीज विद्यापीठ, भरतूर विरूध्द महाराजा छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठ, छत्तरपूर यांच्यात झालेल्या सामन्यात भरतूरला आठ गुणांनी (४-१२) पराभूत व्हावे लागले. छत्तरपूरच्या नितू राजपूत पहिल्या डावात ३.४० मिनीटे व दुसऱ्या डावात ८.२० मिनीटे खेळली. तर आरती अहिरवारने ४ गडी बाद केले व ४ मिनीटे खेळली.

ड गटात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादने डी.वाय.पाटील अभिमत विद्यपीठ, मुंबईचा १ गडी ८ गुण (१२-४) राखून पराभव केला. औरंगाबादच्या कल्याणी सोनवणेने ३.३० मिनीटांचा खेळ केला व पाच गडी बाद केले. रेणूका म्हस्के हिने ३ मिनीटांचा खेळ करत ३ गडी बाद केले. तर पुजा सोळंखे ही २.३० मिनीटे खेळून नाबाद राहिली तसेच तीने दोन गडी बाद केले. राजस्थान विद्यापीठ,जयपूर विरूध्द जिवाजी विद्यापीठ, ग्वाल्हेर

यांच्यातील सामना अटीतटीचा झाला. राजस्थान विद्यापीठाने १ गुण आणि ५ मिनीटे राखून (१३-१२) विजय प्राप्त

केला. रेणू कुमावत, रेखा कुमावत व अर्चना यादव या राजस्थान विद्यापीठाच्या खेळाडूंनी उत्तम खेळाचे प्रदर्शन केले. सोलापूर विद्यापीठाने आर.जी.पी. विद्यापीठ भोपाळवर १ डाव व ११ गुणांनी (१३-२) विजय प्राप्त केला. सोलापूरच्या अमिता विलीप, स्नेहल अंबीयार आणि प्रगती झेंडे यांनी चांगला खेळ खेळून प्रेक्षकांची मने जिंकली.

**बातमी - २**

जळगाव २० (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील हिंदी विभागप्रमुख डॉ.सुनील कुळकर्णी यांची केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली यांनी निःशुल्क पुस्तक वितरण योजनेसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या पुस्तक निवड समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

हिंदी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी केंद्रीय हिंदी निदेशालयाच्या वतीने दरवर्षी हिंदीत्तर भाषी हिंदी प्रदेशातील विद्यापीठ / महाविद्यालयांसाठी निःशुल्क पुस्तक वितरण योजना राबविली जाते. या योजनेत देशभरातील विद्यापीठ / महाविद्यालयांना दोनशे पेक्षा अधिक पुस्तके व आठ ते दहा पत्रिकांचे निःशुल्क वितरण केले जाते. त्यासाठी प्रस्ताव मागविले जातात. निदेशालयाकडून पुस्तक खरेदी करून निःशुल्क वितरण केले जाते. या योजनेत कोणत्या पुस्तकांचा समावेश करावा यासाठी निवड समितीचे गठन केले जाते. या समितीवर पुढील दोन वर्षासाठी डॉ. सुनील कुळकर्णी देशगव्हाणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल सर्वांनी अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र . : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 20 नोव्हेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी